लोकमत

# संशोधकांनी नीतिमत्तेला प्राधान्य द्यावे : डी. टी. शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : संशोधकीय नीतिमत्तेखेरीज शैक्षणिक कार्यात कोणत्याही प्रकारचा गुणात्मक दर्जा प्राप्त करता येणे अशक्य आहे. त्यामुळे या नीतिमत्तेला संशोधकांनी सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी केले. विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या ५९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित 'संशोधन व प्रकाशन नीतिमानता' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादामध्ये ते बोलत होते. डॉ. मुरारी पी. तपस्वी (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी, गोवा), डॉ. महेंद्र एन. जाधव (ग्रंथपाल, केंद्रीय ग्रंथालय, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, मद्रास) यांनी मार्गदर्शन केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी संशोधन पद्धती आराखडा, शास्त्र आणि सामाजिक शास्त्रातील संशोधनाबाबत मार्गदर्शन केले.

लोकमत

# उद्या काळसेकर पुरस्कारांचे वितरण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे दिल्या जाणाऱ्या सतीश काळसेकर काव्य पुरस्कार व ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार यांचा वितरण सोहळा शुक्रवारी (दि. ५ ऑगस्ट) दुपारी ४ वाजता होणार आहे. त्यामध्ये ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांना सतीश काळसेकर काव्य पुरस्काराने, तर दिशा पिंकी शेख यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

तरुण भारत

# डहाके, शेख यांना पुरस्कार जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने वसंत आबाजी डहाके यांना 'सतिश काळसेकर काव्य पुरस्कार', तर दिशा पिंकी शेख यांना 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' जाहिर करण्यात आला आहे. या पुरस्कारांचे वितरण शुक्रवार दि. ५ रोजी शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे.

यावेळी अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के तर प्रमुख पाहूणे म्हणून सांगलीचे ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे उपस्थित राहणार आहेत. तसेच कार्यक्रमास मुंबईच्या सुप्रिया काळसेकर व शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या काळसेकर पुरस्कारांचे वितरण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार व ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार यांचा वितरण सोहळा येत्या शुक्रवार, दि. ५ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ कवी व समीक्षक वसंत आबाजी डहाके यांना सतीश काळसेकर काव्य पुरस्काराने, तर दिशा पिंकी शेख यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे उपस्थित राहणार आहेत. यावेळी सुप्रिया काळसेकर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, काळसेकर कुटुंबीय या कार्यक्रमास उपस्थित असतील. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम होईल, अशी माहिती मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली आहे.

पुण्यनगरी

# क्रांतिसिंह नाना पाटील यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन परिषदेचे अधिष्ठाता एस. एस. महाजन, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये, प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख आशीष देशमुख, एन. ए. कांबळे, एन. व्ही. वाळवेकर, एस. आर. यन्कंची, कास्ट्राईबचे आनंद खामकर, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले आदी उपस्थित होते.

पुढारी

# डॉ. होमी भाभा विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. रजनीश कामत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर.के. तथा रजनीश कमलाकर कामत यांची मुंबई येथील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली आहे. कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी बुधवारी सायंकाळी ही नियुक्ती जाहीर केली.



डॉ. कामत शिवाजी विद्यापीठात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र अधिविभागांचे वरिष्ठ प्राध्यापक आणि अधिविभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. गेल्या २५ वर्षांत त्यांनी गोवा विद्यापीठ पणजी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अशा विविध उच्चशिक्षण संस्थांच्या माध्यमातून त्यांनी योगदान दिले आहे. डॉ. कामत यांचे नामांकित जर्नल्समध्ये १५० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील १६ पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १८ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. संशोधन पूर्ण केले आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माझ्या प्रगतीमध्ये बहुमोल योगदान असल्याचे डॉ. कामत यांनी सांगितले. तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कामत यांची निवड शिवाजी विद्यापीठासाठी अभिमानास्पद असल्याचे म्हटले आहे.

सकाळ

# डॉ. भाभा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. कामत



डॉ. कामत

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रजनीश कमलाकर तथा आर. के. कामत यांची मुंबई येथील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरुपदी आज नियुक्ती झाली. राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी ही नियुक्ती पाच वर्षांसाठी केली.

पान ११ वर »

# डॉ. भाभा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. कामत

» पान १ वरून

राज्यपालांनी छत्तीसगड उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती यतींद्र सिंह यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती स्थापन केली होती. पुणे येथील भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रा. अनुपम शुक्ल व शासनाचे प्रधान सचिव ओमप्रकाश गुप्ता समितीचे सदस्य होते.

डॉ. कामत यांनी गेल्या २५ वर्षांत गोवा विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ आदींच्या माध्यमातून उच्चशिक्षण क्षेत्रात योगदान दिले आहे. त्यांचे

**“ उच्चशिक्षणाच्या क्षेत्राची गुणवत्ता वृद्धिंगत करण्याची संधी दिल्याबद्दल कुलपती भगतसिंह कोश्यारी यांचे मनःपूर्वक आभार मानतो.**

**– डॉ. आर. के. कामत**

१५० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित आहेत. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील १६ पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १८ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली. शिवाजी विद्यापीठात सायबर सुरक्षा केंद्राची स्थापना करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक म्हणून काम करताना शिवाजी विद्यापीठास 'नॅक'चे 'A++' मानांकन प्राप्त करण्यात त्यांची भूमिका होती. पाच वर्षांत त्यांना १० कोटींचे संशोधन प्रकल्प मंजूर झाले. यात युरोपियन युनियनने मंजूर केलेल्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पाचा समावेश आहे. त्यांना 'द इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर्स'चा फेलो म्हणून सन्मानित केले. डॉ. कामत यांची निवड हा विद्यापीठासाठी अभिमानास्पद क्षण असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी म्हटले.

जनसंपर्क कक्ष
04 AUG 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाभा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी कामत

## राज्यपालांकडून नियुक्तीची घोषणा : कोल्हापूरला बहुमान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या



विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. तथा रजनीश कमलाकर कामत यांची मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या पहिल्या कुलगुरुपदी बुधवारी नियुक्ती झाली.

कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषित केली. उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी कार्यरत असणाऱ्या या विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा डॉ. कामत (पान ६ वर)

> कुलगुरुपदी झालेली निवड हा आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे. शिवाजी विद्यापीठाचे माझ्या प्रगतीमध्ये बहुमोल योगदान आहे. त्यांचे स्मरण करून नवी जबाबदारी स्वीकारत आहे. उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात भरीव योगदान देण्यासाठी कुलगुरुपदाच्या कारकिर्दीत प्रयत्नशील राहीन.
>
> **- डॉ. आर. के. कामत**

> डॉ. कामत यांची कुलगुरुपदी झालेली निवड ही विद्यापीठ परिवारासाठी अत्यंत अभिमानास्पद क्षण आहे. त्यांची उच्चशिक्षण क्षेत्रातील विशेषतः माहिती तंत्रज्ञानाधारित संवाद व शिक्षण या क्षेत्रातील कामगिरी उच्च दर्जाची आहे. त्यांच्या अनुभवाचा डॉ. होमी भाभा विद्यापीठाच्या प्रगतीमध्ये निश्चितपणे लाभ होईल.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरु

**डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठ :** राज्य शासनाने सन २०१९ मध्ये डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी ही इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, मुंबईसह क्लस्टर युनिव्हर्सिटी म्हणून स्थापन केली आहे. एल्फिन्स्टन कॉलेज, सिडनहॅम कॉलेज, माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालय या विद्यापीठाची घटक महाविद्यालये आहेत. उच्चशिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार हे विद्यापीठ स्थापन झाले आहे.

# भाभा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी कामत

**(पान १ वरून)** यांच्या माध्यमातून कोल्हापूरला बहुमान लाभला. कुलगुरू नियुक्तीसाठी राज्यपालांनी छत्तीसगड उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती यतींद्र सिंह यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठित केली होती. पुणे येथील भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रा. अनुपम शुक्ल आणि शासनाचे प्रधान सचिव ओम प्रकाश गुप्ता समितीचे सदस्य होते. समितीने शिफारस केलेल्या अंतिम पाच उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी डॉ. कामत यांची नियुक्ती केली. त्यांची नियुक्ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी आहे. मूळचे कागल येथील असणारे डॉ. कामत हे शिवाजी विद्यापीठात इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. गेल्या २५ वर्षांत त्यांनी शिवाजी विद्यापीठ, गोवा विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या माध्यमातून उच्चशिक्षण क्षेत्रात योगदान दिले आहे. अनेक प्रशासकीय जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडल्या आहेत. त्यात शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन अँड इनक्युबेशन लिंकेजिसचे संचालक, तंत्रज्ञान विभागाचे संचालक, इलेक्ट्रॉनिक्स तसेच संगणकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या करिअर कौन्सिलिंग कक्षाचे समन्वयक पदांचा समावेश आहे.

## उच्च शिक्षण, संशोधनात योगदान

डॉ. कामत यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील १६ पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १८ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. केली आहे. शिवाजी विद्यापीठात सायबर सुरक्षा केंद्राच्या स्थापनेत आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालकपदी काम करताना विद्यापीठास 'नॅक'चे ए प्लस प्लस मानांकन प्राप्त करण्यामध्ये त्यांचे योगदान राहिले. गेल्या पाच वर्षांत त्यांना १० कोटी रुपयांचे संशोधन प्रकल्प मंजूर झाले आहे. त्यात युरोपियन युनियनच्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पाचा समावेश आहे. त्यांना विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने यंग सायंटिस्ट, तर शिवाजी विद्यापीठाने आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले आहे. कुलगुरूपदी निवड झाल्यानंतर डॉ. कामत यांच्या नातेवाईक, मित्रमंडळी, विद्यापीठ आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध घटकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला.

तरुण भारत

# डॉ. भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. आर. के. कामत

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर के. कामत यांची आज मुंबई येथील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली आहे. कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी ही नियुक्ती घोषित केली. ही नियुक्ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी आहे. कुलगुरु नियुक्तीसाठी राज्यपालांनी छतीसगड उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती यतींद्र सिंह यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत केली होती. पुणे येथील भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रा. अनुपम शुक्ल व शासनाचे प्रधान सचिव ओम प्रकाश गुप्ता समितीचे सदस्य होते.



**पान ९ पहा**

## डॉ. भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. आर. के. कामत

**पान १ वरून**

समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी डॉ कामत यांची निवड केली. डॉ. कामत शिवाजी विद्यापीठात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र अधिविभागांचे वरिष्ठ प्राध्यापक आणि अधिविभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. गेल्या २५ वर्षांत त्यांनी गोवा विद्यापीठ, पणजी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, आणि शिवाजी विद्यापीठ अशा विविध उच्चशिक्षण संस्थांच्या माध्यमातून उच्चशिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. त्यांचे जर्नल्समध्ये दीडशेहून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील १६ पुस्तकांचे लेखन त्यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १८ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. संशोधन पूर्ण केले आहे. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक म्हणून काम करताना शिवाजी विद्यापीठास 'नॅक'चे 'A++' मानांकन प्राप्त करण्यामध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली. गेल्या पाच वर्षांत त्यांना १० कोटी रुपयांचे संशोधन प्रकल्प मंजूर झाले आहेत. यामध्ये युरोपियन युनियनने मंजूर केलेल्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पाचा समावेश आहे. डॉ. कामत युरोप आणि दक्षिण पूर्व आशियातील अनेक देशांमध्ये संशोधनाच्या निमित्ताने गेले आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने त्यांना यंग सायंटिस्ट पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांनी महाराष्ट्रात परीक्षा सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी राजेश अग्रवाल समितीवर तसेच महाराष्ट्र शासनाच्या राज्य गुणवत्ता परिषदेवरही काम केले.

**गुणवत्तापूर्ण योगदान देण्याची संधी: डॉ. आर. के. कामत**

हा आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने स्थापन झालेल्या शिवाजी विद्यापीठाचे माझ्या प्रगतीमध्ये बहुमोल योगदान आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह सर्वच कुलगुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

**अभिमानास्पद क्षण : कुलगुरू डॉ. शिर्के**

डॉ. कामत यांची डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड होणे हा शिवाजी विद्यापीठ परिवारासाठी अत्यंत अभिमानास्पद क्षण आहे.

0 4 AUG 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क क
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. होमी भाभा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. कामत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रजनीश कमलाकर कामत यांची मुंबई येथील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आली. कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी बुधवारी सायंकाळी ही नियुक्ती घोषित केली. ही नियुक्ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी आहे.

## उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण योगदानाची संधी



शिवाजी विद्यापीठाचे माझ्या प्रगतीमध्ये बहुमोल योगदान आहे. त्यांचे स्मरण करून नवी जबाबदारी स्वीकारत आहे. या विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह ज्यांच्यासमवेत काम केले, त्या सर्वच कुलगुरुंप्रति याप्रसंगी कृतज्ञता व्यक्त करतो. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात भरीव योगदान देण्यासाठी कुलगुरू पदाच्या कारकीर्दीत प्रयत्नशील राहू, असे डॉ. कामत यांनी सांगितले.

कुलगुरू नियुक्तीसाठी राज्यपालांनी छत्तीसगड उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती यतींद्र सिंह यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत केली होती. पुणे येथील भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रा. अनुपम शुक्ल व शासनाचे प्रधान सचिव ओम प्रकाश गुप्ता समितीचे सदस्य होते. समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी डॉ. कामत यांची निवड केली.

डॉ. आर. के. तथा रजनीश कामत शिवाजी विद्यापीठात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र अधिविभागांचे वरिष्ठ प्राध्यापक आणि अधिविभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. गेल्या २५ वर्षांत त्यांनी गोवा विद्यापीठ, पणजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अशा विविध उच्च शिक्षण संस्थांच्या माध्यमातून उच्च शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन लिन्केजिसचे संचालक, तंत्रज्ञान विभागाचे संचालक, इलेक्ट्रॉनिक्स तसेच संगणकशास्त्र अधिविभागांचे प्रमुख, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या करिअर कौन्सिलिंग कक्षाचे समन्वयक आदी पदांचा समावेश आहे.

04 AUG 2022
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो सायन्सचे विद्यार्थी इस्त्रोच्या भेटीवर

## एक वर्षाचे प्रशिक्षण ; प्र-कुलगुरूंनी दिल्या शुभेच्छा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे दहा विद्यार्थी आज भारतीय अवकाश संशोधन संस्थेसह (इस्त्रो) विविध आघाडीच्या नामांकित संशोधन संस्था व कंपन्यांमध्ये एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रवाना झाले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी आज त्यांना शुभेच्छा दिल्या.

विद्यापीठातच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या पाच वर्षांच्या एकात्मिक अभ्यासक्रमाच्या अखेरच्या अर्थात पाचव्या वर्षी विद्यार्थ्यांना पूर्ण एक वर्षाचा संशोधन प्रकल्प किंवा विविध कंपन्यांत प्रशिक्षण करावयाचे असते. त्याअंतर्गत यंदाच्या शैक्षणिक वर्षात पहिल्या निवड यादीत एकूण दहा विद्यार्थ्यांची संशोधन प्रकल्प तसेच कंपनी प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांनी स्कूल ऑफ नॅनोसायन्सचे माजी संचालक आणि शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी त्यांनी या संधीचा आपली कारकीर्द घडविण्यासाठी पुरेपूर वापर करावा, अशा शब्दांत प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सदिच्छा दिल्या. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा आणि अधिविभागातील वरिष्ठ संशोधक सहयोगी डॉ. शरद पाटील उपस्थित होते.

या विद्यार्थ्यांना अधिविभागातील अ‍ॅडजंक्ट प्राध्यापक डॉ. प्रकाश वडगांवकर (मानद शास्त्रज्ञ, सीएसआयआर-एनसील, पुणे) यांचे मार्गदर्शन लाभले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्सचे विद्यार्थी इस्त्रो संस्थेत प्रशिक्षणासाठी जाणार आहेत. प्र-कुलगुरू पी.एस.पाटील यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. सोबत संचालक डॉ. शर्मा.**

### विद्यार्थ्यांची नावे अशी

इस्त्रो (बेंगलोर) - साक्षी निगवेकर, एन.सी.एल., पुणे : अबोली शिंदे, अमित बिरजे, मृदुला धेंडे, रिना सौबम, विनायक निर्मळे. केमसाय इनोव्हेशन, (पुणे) - अभिलाषा देशपांडे, प्रतीक्षा भागनगोल, ऋतुजा चौगुले. प्रो-केअर क्रॉप सायन्स (सांगली) - सृष्टी काडगे.

04 AUG 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नॅनोसायन्स'चे विद्यार्थी प्रशिक्षणासाठी रवाना

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे दहा विद्यार्थी भारतीय अवकाश संशोधन संस्थेसह (इस्त्रो) विविध आघाडीच्या नामांकित संशोधन संस्था व कंपन्यांमध्ये एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रवाना झाले.



पहिल्या निवड यादीत एकूण दहा विद्यार्थ्यांची संशोधन प्रकल्प तसेच कंपनी प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्यात आली. त्यांची नावे अशी : इस्त्रो (बेंगलोर) : साक्षी निगवेकर. एनसीएल पुणे : अबोली शिंदे, अमित बिरजे, मृदुला धेंडे, रिना सौबम, विनायक निर्मळे. केमसाय इनोव्हेशन पुणे : अभिलाषा देशपांडे, प्रतीक्षा भागनगोल, ऋतुजा चौगुले. प्रो-केअर क्रॉप सायन्स सांगली : सृष्टी काडगे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी किरणकुमार शर्मा आणि अधिविभागातील वरिष्ठ संशोधक सहयोगी डॉ. शरद पाटील उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठाच्या 'नॅनोसायन्स'चे दहा विद्यार्थी इस्त्रोमध्ये प्रशिक्षणाला रवाना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे दहा विद्यार्थी बुधवारी भारतीय अवकाश संशोधन संस्थेसह (इस्त्रो) विविध आघाडीच्या नामांकित संशोधन संस्था व कंपन्यांमध्ये एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रवाना झाले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या पाच वर्षांच्या एकात्मिक अभ्यासक्रमाच्या अखेरच्या अर्थात पाचव्या वर्षी विद्यार्थ्यांना पूर्ण एक वर्षाचा संशोधन प्रकल्प किंवा विविध कंपन्यांत प्रशिक्षण करावयाचे असते. या विद्यार्थ्यांना अधिविभागातील ॲडजंक्ट प्राध्यापक डॉ. प्रकाश वडगांवकर (मानद शास्त्रज्ञ, सीएसआयआर-एनसील, पुणे) यांचे मार्गदर्शन लाभले.

निवड झालेले विद्यार्थी कंसात निवड झालेली संस्था पुढीलप्रमाणे; इस्त्रो (बेंगलोर) : साक्षी निगवेकर, एन.सी.एल., पुणे: अबोली शिंदे, अमित बिरजे, मृदुला धेंडे, रिना सौबम, विनायक निर्मळे, केमसाय इनोव्हेशन, पुणे: अभिलाषा देशपांडे, प्रतीक्षा भागनगोल, ऋतुजा चौगुले, प्रो-केअर क्रॉप सायन्स, सांगली: सृष्टी काडगे यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांनी स्कूल ऑफ नॅनोसायन्सचे माजी संचालक आणि शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी त्यांनी या संधीचा आपली कारकीर्द घडविण्यासाठी पुरेपूर वापर करावा, अशा शब्दांत प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सदिच्छा दिल्या. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी डॉ. किरणकुमार शर्मा डॉ. शरद पाटील उपस्थित होते.



**कोल्हापूर : विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. किरणकुमार शर्मा.**


0 4 AUG 2022 लोकमत
जनसंपर्क क...
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडूंसाठी 'प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती'

## शिवाजी विद्यापीठ : सहाजणांना प्रत्येकी ५० हजारांची मदत

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणाऱ्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर क्रीडा शिष्यवृत्ती योजना शिवाजी विद्यापीठाने यावर्षीपासून सुरू केली आहे. खेळाडूंना स्पर्धेदरम्यान कालावधी कमी असल्यास सोयीच्या वाहन प्रकाराने प्रवास करण्यास खास बाब म्हणून परवानगी दिली असल्याची माहिती विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभागाने बुधवारी दिली.




कोल्हापूर शहर व जिल्हा नागरी कृती समितीने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना दिलेल्या विविध मागण्यांच्या निवेदनानंतर क्रीडा अधिविभागाने कामगिरीची माहिती दिली. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या सुबिया मुल्लाणी, रोहन कांबळे, स्वाती शिंदे, अनुष्का पाटील, संकेत सरगर, नंदिनी साळोखे यांना प्रोत्साहनपर प्रत्येकी ५० हजार रुपये इतका मदतनिधी दिला आहे. गेल्या शैक्षणिक वर्षात बंगळुरू येथे झालेल्या द्वितीय खेलो इंडिया स्पर्धेत विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी वेगवेगळ्या क्रीडाप्रकारांत एकूण २२ पदके मिळवून देशात १० वा क्रमांक प्राप्त केला. स्पोर्ट्स हॉस्टेल बांधण्यात येणार असून, ३०० खेळाडूंची निवास व्यवस्था तेथे होणार आहे. विद्यापीठाने मिशन ऑलिम्पिक ही संकल्पना घेऊन काम सुरू केले असून, त्या दृष्टीने या सुविधा उपयुक्त ठरणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
0 4 AUG 2022 पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कॅलिओफिस कॅस्टो' सर्पाची गगनबावड्यात नोंद

## जिल्ह्यातील दुसरी नोंद : शिवाजी विद्यापीठातील अभ्यासकाचे संशोधन


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोकणच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली येथे सापडणाऱ्या 'कॅलिओफिस कॅस्टो' या अत्यंत दुर्मीळ सापाची दुसरी नोंद कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावड्यात झाली आहे. शिवाजी विद्यापीठाचे निसर्ग अभ्यासक सचिन कांबळे (रा. गगनबावडा) यांनी याबाबत संशोधन केले असून सरीसृपतज्ज्ञ डॉ. वरद गिरी यांनी या सापाची ओळख पटवून दिली आहे. गगनबावड्यातील या सापाच्या अधिवासामुळे पश्चिम घाटातील या तालुक्याची समृद्ध जैवविविधता अधोरेखित झाली आहे.



**सचिन कांबळे**

बंगळूरमधील वन्यजीव अभ्यासक प्रवीण एच. एन. आणि शिवाजी विद्यापीठात प्राणीशास्त्राचे विद्यार्थी सचिन कांबळे यांनी ही नोंद केली. आंतरराष्ट्रीय नियतकालिक 'हमदर्याद'मध्ये हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. यापूर्वी ही नोंद सरीसृपतज्ज्ञ डॉ. वरद गिरी आणि सहकाऱ्यांनी २०१३ मध्ये आंबोली (जि. सिंधुदुर्ग) येथून केली आहे. सांगशी (ता. गगनबावडा) येथे २८ जून २०२० रोजी सचिन कांबळे यांना हा सर्प जमिनीखाली आढळला. यापूर्वी या सापाची पाहिली नोंद्र आजऱ्यातून मयूर जाधव आणि सहकाऱ्यांनी केली होती. सरीसृपतज्ज्ञ डॉ. वरद गिरी यांनी हा सर्प 'कॅलिओफिस कॅस्टो' प्रजातीमधील असल्याचे स्पष्ट केले. त्याला रुजबेह गझदार आणि अनुज शिंदे यांनी दुजोरा दिला आहे.



**कोल्हापूर : सांगशी (ता. गगनबावडा) येथे आढळलेला दुर्मीळ सर्प 'कॅलिओफिस कॅस्टो'.**

### भारतात पाच प्रजातींचा आढळ


'कॅलिओफिस कॅस्टो' या वंशामध्ये सध्या १५ मान्यताप्राप्त प्रजाती आहेत. यापैकी भारतात पाच प्रजाती आढळतात. यापूर्वी २००० मध्ये पहिली नोंद झाली होती. पश्चिम घाटातून याची नोंद आंबोली (महाराष्ट्र), कारवार (कर्नाटक) आणि डिचोली-बिचोलीम (दक्षिण गोवा) या वेगवेगळ्या भागांत झाली होती. अलीकडे कोटिगाव वन्यजीव अभयारण्य (गोवा, २०२१) व मडिलगे आणि होनेवाडी (महाराष्ट्र, २०२१) येथूनही नोंद झाली आहे.

Times of India

# Rare snake recorded in Kolhapur's Gagan Bawda

TIMES NEWS NETWORK

Sachin Kamble




This snake was found two feet below ground in loose soil

**Kolhapur**: Calliophis castoe, a rare snake which was earlier recorded in Sindhudurg district's Amboli village in 2013, has now been recorded at Gagan Bawda in Kolhapur.

Zoology student of Shivaji University Kolhapur (SUK) Sachin Kamble and wildlife researcher from Bangalore Praveen H.N. have carried out the research on this snake. Their research paper has been published in the international journal, Hamadryad.

**The snake was identified as Calliophis castoe based on its mix-colour, slender body, orange stripe on the head, and uniform orange colouration under the tail**

Kamble said "I found this snake under the ground on June 28, 2020, at Sangshi village in Gagan Bawda, Kolhapur district. Earlier, the sighting of this snake was recorded in Ajara by Mayur Jadhav and his colleagues. Currently, there are 15 recognised species in the genus — Calliophis castoe — of which, five species are found in India. This is one of the least known snake species from India. Due to the record of this snake, the rich biodiversity of Gagan Bawda in the Western Ghats has also been highlighted".

Herpetologist Varad Giri said, "It was identified as Calliophis castoe based on its mix-colour, slender body, orange stripe on the head, and uniform orange colouration under the tail. Its total length was 80 cm and was found while digging a hole in the garden of a house. This snake was found two feet below ground in loose soil. Its characteristic feature is that it curls its tail."